**प्रेस नोट दिनांक ०३/१०/२०१८**

**जागतिक ज्येष्ठ नागरीक दिनाचे कार्यक्रमा बाबत..**

**<u>चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर</u>**

---

दिनांक ०१/१०/२०१८ रोजी जागतिक ज्येष्ठ नागरीक दिन असल्याने चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीत खालील प्रमाणे मिटींगचे आयोजन करून हद्दीतील एकटे राहणारे ज्येष्ठ नागरीक यांना भेटी देवुन शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांना असणारे अडीअडचणी बाबत विचारणा करुन त्यांचे समस्या सोडवणेबाबत त्यांचेशी चर्चा केली. त्यामध्ये खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आले होते.

**(१)** दिनांक १/१०/२०१८ रोजी ११/०५ ते १२/०० वा दरम्यान पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. विठ्ठल दरेकर यांनी बेहरे जेष्ठ नागरीक आश्रम, खराडी या ठिकाणी भेट देऊन जेष्ठ नागरीक दिनानिमित्त सदर ठिकाणच्या जेष्ठ नागरीक यांच्या भेटी घेंऊन शुभेच्छा दिल्या व सदर ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली. सदर ठिकाणी ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजकांनी ज्येष्ठ नागरीक यांच्या मनोरंजना करिता नृत्यांचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरीकांनी आपली मनोगते व्यक्त करून शुभेच्छा दिलेबाबत आभार व्यक्त केले. तसेच जेष्ठ नागरिक यांच्याशी वैयक्तिक संवाद साधुन त्यांना काही अडचणी/शंखा असल्यास त्या विचारून त्यांचे निरसन केले व त्यांचे सुरक्षिततेसंबंधाने चर्चा करुन त्यांना पोलीसांकडुन देण्यात आलेल्या जेष्ठ नागरीक ओळखपत्राबाबत चर्चा केली. तसेच त्यांना काही अडचण आल्यास चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधने बाबत माहिती दिली. सदर ठिकाणी ६० ते ६५ जेष्ठ नागरीक जनसमुदाय हजर होता.

**(२)** दिनांक १/१०/२०१८ रोजी ११/०० ते १४/०० वा दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री मोरे, पोलीस उप-निरीक्षक श्री शिंदे, पोशि मुंढे, महिला पोलीस नाईक ६११९ भोंडवे, महिला पोलीस नाईक महांगडे, यांना समक्ष चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीत एकटे राहणारे ज्येष्ठ नागरीक यांची ०१ ऑक्टोंबर जागतिक ज्येष्ठ नागरीक दिननिमित्त भेटी घेणेकामी पाठवुन शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच त्यांच्या अडीअडचणी संबंधात चर्चा करुन समस्यांचे निराकरण केले व व्हॅटस् ॲप ग्रुपवर संदेश देण्याचे सुचित केले. तसेच काही अडचण आल्यास पोलीस नियंत्रण कक्षाचे १०० नंबर व चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर ०२०/२७०१२३२१ व गोपनिय शाखेमध्ये काम करणारे, पोहवा ३१४ कदम,म.पो.ना ६११९ भोंडवे व पोशि ८६७९ नाणेकर यांचा मोबाईल नंबर दिला. एकुण १४ ज्येष्ठ नागरीकांना भेट दिल्या आहेत.

**(३)** दिनांक ०१/१०/२०१८ रोजी सायंकाळी १७/०० ते १८/०० वा दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन येथे चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीतील ज्येष्ठ नागरीकांची मिटींग आयोजित केली होती. मिटींग करीता वडगावशेरी व चंदननगर, खराडी ज्येष्ठ नागरीक संघातील ज्येष्ठ नागरीक तसेच एकटे रहाणारे ज्येष्ठ नागरीक हजर राहिले. वडगावशेरी ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष श्री गुलाबराव पवार यांनी ज्येष्ठ नागरीकांतर्फे पोलीसांकडुन मिळणाया मदतीबाबत व सहकार्याबाबत सांगुन पोलीसांच्या तत्परतेकरीता ज्येष्ठ नागरीकांकडुन पोलीसांचे आभार व्यक्त केले. त्यांच्या अडीअडचणींची विचारणा केली. तसेच ज्येष्ठ नागरीकांना कोणत्याही प्रकारची मदतीची आवश्यकता असलेस पोलीस नियंत्रण कक्षाचे १०० नंबर, पोलीस स्टेशन फोन नं.०२०/२७०१२३२१ व व्हॅटस् ॲप ग्रुपवर संदेश देण्याचे सुचित केले. पोलीस स्टेशन हद्दीतील एकटे रहणारे ज्येष्ठ नागरीकांना प्रत्येकी एक पोलीस नेमुन त्यांना दत्तक घेऊन त्यांना योग्य ती मदत पुरवण्यात येणार असल्याचे सांगितले. ज्येष्ठ नागरीकांचे वतीने श्री पोपट धोका यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले. सदर मिटींगकरीता एकुण ९० ते १०० ज्येष्ठ महिला व पुरुष नागरीक हजर होते.

सोबतः- कार्यक्रमाचे फोटो सादर केले आहेत.


























